# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 243/2022 दिनांक : 18.06.2022

## 1)खुनः—

**इतवारा :—**दिनांक 17.06.2022 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरी इतवारा, नांदेड येथे,** यातील **मयत नामे श्यामसिंह राजनसिंह ठाकुर, वय 45 वर्षे, रा. काळेश्वर नगर विष्णुपुरी, नांदेड,** यास यातील नमुद आरोपीने जुन्या घराचे वाटणीचे भांडणाचे कारणावरुन धारदार चाकुने छातीवर,पोटावर सपासप वार करुन गंभीर जखमी करुन खुन केला. वगैरे **फिर्यादी मेनकाबाई श्यामसिंह ठाकुर, वय 36 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. काळेश्वर नगर विष्णुपुरी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 151/2022 कलम 302 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री शिवसांब स्वामी, मो.नं. 9823039256** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :—

**विमानतळ :—**दिनांक 15.06.2022 रोजी 12.00 वा. ते दिनांक 16.06.2022 रोजी 24.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घर ओंकारेश्वर नगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे कुटूंबासह न्यायालयीन कामासाठी औरंगाबाद येथे गेले असता फिर्यादीचे घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन घरातील एक लोखंडी कपाट व दोन लाकडी कपाट तोडुन त्यात ठेवलेले सोन्याचे दागीने व नगदी असा एकुण 6,78,000/—रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी राजेश खंडेराव देशमुख, वय 46 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. ओंकारेश्वर नगर, देवगिरी नगर तरोडा बु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 203/2022 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री देवके, मो.क्रं. 9545688895** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :—

**मुदखेड :—** दिनांक 14.06.2022 रोजी 21.30 वा. ते दिनांक 15.06.2022 रोजी 05.30 वा. चे दरम्यान, **कृष्णानगर मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपणीची मो. सा. क्रं. एमएच—13/सीपी—5906 किमती 18,000/—रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी वैभव राजेंद्र कदम, वय 30 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. कृष्णानगर मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 135/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1375 ठाकुर, मो.क्र. 7774361375** हे करीत आहेत.

## 4)चोरी :—

**1)हदगाव :—**दिनांक 17.06.2022 रोजी 05.00 वा. चे सुमारास, **डोरली शेत शिवार ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेता मधील विहीरीवर बसवलेली सौर उर्जा शक्ती कंपनीची मोटार किंमती 35,000/—रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयानी चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी बाळासाहेब मारोतराव शेळके, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. डोरली ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 199/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2005 नामवाडे, मो.क्र. 7219064557** हे करीत आहेत.

**2)अर्धापूर :—**दिनांक 14.06.2022 रोजी 20.00 वा. ते दिनांक 16.06.2022 रोजी 02.00 वा. चे दरम्यान, **लहान ते बारड जाणाऱ्या रोडवर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे लहान शिवारातुन ग्राउंड मध्ये टाकलेली अल्युमिनियम ची केबल 160 मीटर जुनी वापरती किंमती 2,70,000/— रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयानी चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शशांक हरिशंकर शर्मा, वय 43 वर्षे, व्यवसाय गुत्तेदारी रा. शिवरायनगर मालेगाव रोड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 170/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री राठोड, मो.क्र. 9823143245** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :—

**हिमायतनगर :—**दिनांक 17.06.2022 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर मौजे वाधी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचे रिकामे जागेवर कब्जा करुन लोखंडी रॉडने फिर्यादीचे डोक्यात,हातावर,पाठीवर मारुन गंभीर दुखापत केली व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी संदीप नानाराव माने, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. वाधी ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरन 141/2022 कलम 326,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/बालाजी गोविंदराव महाजन, मो. नं. 9689707038** हे करीत आहेत.

## 6)फसवणुक :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 03.08.2015 रोजी 00.00 वा. दरम्यान, **दत्तनगर, नादेड येथे,** यातील नमुद आरोपीने जानिवपुर्वक खोटी सौदाचिट्ठी करारनामा तयार करुन फिर्यादीच्या मालकी व ताब्यातील दूकान बळकावण्याचा प्रयत्न करुन फसवणुक केली व खोटी अॅट्रासिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी कुलजित कौर इंद्रसिंग मोहणसिंग भाटीया, रा. वजिराबाद, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 231/2022 कलम 420,468,471,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री पुणे, मो.नं. 9403188318** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 17.06.2022 रोजी 00.45 वा. चे सुमारास, **मुदखेड बायपास चौरस्ता येथे उडाणपुलाजवळ वाजेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या एक लोखंडी तलवार किंमती 150/–रूपयाची ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोका/3376 चंद्रकांत सुभाष स्वामी, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 361/2022 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.क्र. 9284351496** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**1)मुखेड :–** दिनांक 17.06.2022 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **शिवाजी पुतळयाजवळ समोरील रोडवर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2400/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गजानन दत्ता काळे, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 188/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1793 राठोड, मो.क्र. 9075991793** हे करीत आहेत.

**2)किनवट :–** दिनांक 16.06.2022 रोजी 23.45 वा. चे सुमारास, **मौजे टिंगणवाडी येथील आश्रम शाळेचे समोरील किनवट ते बोधडी बुद्रक जाणारे रोडवर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी मोहफुले वाहतुक करण्याचा वन विभागाचा परवाना नसतांना तसेच मोहफुले खरेदी विक्री करण्यासाठी आवशक असलेला परवाना नसताना तसेच पेसा कायदा अंतर्गत चे स्वतः आदिवासी समाजाचे नसल्याचे त्यांना मोहफुले खरेदी विक्री करण्याचा अधिकारी नसताना अंदाजे किंमती 8,27,197/–रुपयाचे व ट्रकची किंमत अंदाजे 9,00,000/–रुपये असा एकुण 17,27,197/–रुपयाचा माल विनापरवाना बेकायदेशीर रित्या वाहतुक करीत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मिथुन विश्वनाथ सावंत, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 123/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सावंत, मो.क्र. 9856935555** हे करीत आहेत.

## 9)पाण्यात बडुन मृत्यु :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 17.06.2022 रोजी 14.00 वा. चे सुमारास, **विष्णुपुरी डॅम नांदेड येथे,** यातील **मयत नामे आकाश प्रकाश गायकवाड, वय 28** वर्षे, **रा. म्हाडा कॉलनी, नांदेड**, हा विष्णुपुरी डॅममध्ये पोहण्यासाठी गेला व पाण्यात बुडुन मरण पावला. वगैरे **खबर देणार प्रकाश दिगंबर गायकवाड, वय 58** वर्षे, **व्यवसाय सलुन दुकान रा. म्हाड कॉलनी, नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** आ. मृ. 72/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/124 गवळी, मो.नं. 8208681527** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड